सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२** **ई-मेल:** pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१६०२४(११)/१/२०२६-१६/E- ३१८०७८५ /कृ.अ. दि. ३०/०४/२०२६

**प्रति,**

१. **विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)**

२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)**

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभ घटकांतर्गत सामूहिक शेततळे घटकाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत**

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र.- नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४.१०.२०२४.

२) शासन निर्णय क्र.- शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A (E-११६८०५०), दि. ०८.०७.२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. शेतकऱ्यांना संरक्षित सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व पाण्याची साठवण क्षमता वाढविण्यासाठी सामूहिक शेततळे घटक टप्पा-२ मध्ये राबविणे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सामूहिक शेततळे घटकाच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत. त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकाची अंमलबजावणी करण्यात यावी.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 30-04-2026
17:23:23

**(मिनल करनवाल)**

**प्रकल्प संचालक**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**प्रत:-** आयुक्त (कृषि) , कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीस्तव.

# सामुहिक शेततळे

(Group Farm Pond)

## प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीची पाणलोट व जलसंधारणाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी विविध योजनामधून अनुदानावर सामुहिक शेततळे योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे शेतक-यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. काही शेतकऱ्यांकडे शेततळ्यासाठी योग्य जागा नाहीत, तसेच शेततळे बांधकाम, अस्तरीकरण आणि तांत्रिक कामांचा वैयक्तिक पातळीवर होणारा अधिकचा खर्च कमी करणे यासाठी सामूहिक पद्धतीने मोठा पाणीसाठा निर्माण करून समूहातील सर्व शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश समोर ठेऊन जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत  सामुहिक शेततळे घटक राबविणे प्रस्तावित आहे.

## उद्दिष्टे:

१. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावामधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करणे.
३. दुबार पिकाखालील क्षेत्र वाढविणे व शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करणे.
४. शेततळ्याच्या माध्यमातून फळे व भाजीपाला पिके, मत्स्योत्पादन, बागायत, आणि पशुपालन यांसारख्या पूरक शेती उपक्रमांना प्रोत्साहन देणे
५. जलस्रोतांचे संवर्धन करून, भूजल पातळी सुधारण्यासाठी योगदान देणे.

## लाभार्थी निवडीचे  निकष :

१. सामुहिक शेततळे घटकाचा लाभ हा शेतकरी समुहासाठी आहे. समुहात दोन किंवा अधिक शेतकरी असावेत. शेतकरी संयुक्त कुंटुबातील नसावेत. शेतकऱ्यांचे जमीन धारणेबाबतचे ७/१२ खाते उतारे स्वतंत्र असावेत.
२. प्रकल्पांतर्गत सामूहिक शेततळे या घटकासाठी शेतकरी समूहामध्ये फार्मर आय डी नुसार ५ हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेले शेतकरी पात्र राहतील.
३. शेतकऱ्यांच्या समुदायाची अनुक्रमे अनुसूचित जाती शेतकरी समूह, अनुसूचित जमाती शेतकरी समूह, महिला शेतकरी समूह, दिव्यांग व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी समूहाची निवड करण्यात येईल.
४. अर्जदार शेतकरी समूहातील शेतक-यांनी यापूर्वी  मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी अथवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे तसेच शेततळे अस्तरीकरण या घटकाकरीता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.
५. लाभार्थी समूहाकडे जेवढे क्षेत्र असेल तेवढ्या क्षेत्रासाठी आवश्यक क्षमतेचे सामुहिक शेततळे घेता येईल.
६. निवडलेल्या आकारमानाच्या शेततळ्यासाठी तांत्रिक निकषानुसार योग्य जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

७. शेततळ्यातील पाणी वापराबद्दल तसेच शेततळ्याच्या जमिनीबद्दल लाभार्थींमध्ये आपसामध्ये सामंजस्याचा करार करावा.

### सामुहिक शेततळे जागा निवडीसाठी तांत्रिक निकष -:

शेततळ्यासाठी जागेच्या निवडीबाबत निकष खालीलप्रमाणे राहतील.

१. ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे अशी जमिन असलेल्या जागेची निवड करावी.
२. सामुहिक शेततळयासाठी जागा निवडताना कठिण खडक, जिवंत पाण्याचे झरे लागणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याकरीता जमीन निवडताना ट्रायल पीट घेवून जागा निश्चित करावी. तसेच वालुकामय सच्छिद्र खडक असलेली जागा शेततळ्याकरिता निवडू नये.
३. पूर्वी केलेली विहीर, नैसर्गिक खड्डा अथवा दगड खाणी इ. जागी शेततळे घेण्यात येवू नये.
४. नाल्याच्या/ओहोळाच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येवू नये.
५. शेततळ्यासाठी पाणी पुनर्भरणासाठी स्त्रोत असल्याची खात्री करण्यात यावी.

### अर्थसहाय्य:

१. या घटकांतर्गत खालील पैकी एका आकारमानाचे सामुहिक शेततळे घेण्यास मुभा राहील.
२. सामुहिक शेततळे करिता येणाऱ्या खर्चाच्या ७५% किंवा जास्तीत जास्त अनुदान मर्यादेप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.

| अ. क्र. | सामुहिक शेततळ्यांचे आकारमान लांबी x रुंदी x खोली (मी) | क्षमता घ.मी. | समूहाचे प्रकल्प गावामधील किमान जमीन धारणा क्षेत्र | अर्थसहाय्य (रुपये) खर्च मापदंड | अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३४ x ३४ x ४.७ | ५००० | ३.५१ हे. किंवा त्यापेक्षा अधिक | ३६९००० | २७६७५० |
| २. | ३० x ३० x ४.४ | ३५०० | २.०१ ते ३.५० हे. | २७५००० | २०६२५० |
| ३. | २४ x २४ x ४.० | २००० | १.०० ते २.०० हे. | १६०००० | १२०००० |

**संदर्भ:** जाक्र. मराफऔवम/सा. शेत/सु. मार्गदर्शक सुचना/११७८/२०२५ पुणे-५, दि.२४/०९/२०२५ : "एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सामुहिक शेततळे घटकाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना (सन २०२५-२६) ".

- उपरोक्त मंजूर आकारमानापेक्षा जास्त आकारमानाचे शेततळे घ्यावयाचे असल्यास मंजूर अनुदानापेक्षा जास्त लागणारा खर्च हा लाभार्थी शेतकऱ्यांना स्वत: करावयाचा आहे.

### अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

#### लाभार्थी

१. इच्छुक लाभार्थी शेतकरी समूहातील शेतकऱ्यांनी एकाची प्रतिनिधी म्हणून निवड करावी व त्याचे मार्फत सामूहिक शेततळे या बाबीकरीता अर्ज करावा.
२. प्रतिनिधी शेतकऱ्याने प्रकल्पाच्या https://dbt-ndksp.mahapocra.gov.in या पोर्टल द्वारे अथवा महाविस्तार AI या मोबईल ॲप द्वारे अर्ज सादर करावा.
३. प्रतिनिधी शेतकऱ्याने अर्ज सादर करताना समूहातील इतर शेतकऱ्यांची देखील माहिती अपलोड करावीत.
४. शेततळ्याला लागणारी जागा शेतकऱ्याने स्वखुशीने व विनामूल्य द्यावयाची आहे.
५. शेतकऱ्यांनी अर्ज करते वेळी विहित प्रपत्रातील (परिशिष्ट -२ ) हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६. पुर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर शेततळ्याचे काम चार महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील. विहित कालावधीत काम पूर्ण न झाल्यास पूर्वसंमती रद्द करण्यात येईल.
७. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचना, तांत्रिक निकषाप्रमाणे शेततळ्याचे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.
८. लाभार्थ्याने स्वत:/ मजुराद्वारे/ अन्य पर्यायी साधनांच्या (जेसीबी, पोकलेन सारखे मशिन्स) सहाय्याने शेततळे पूर्ण करावयाचे आहे. याकरीता आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. तसेच कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.
९. निवडलेल्या लाभार्थी समूहाने कृषी विभागाकडे नोंदणीकृत सेवा पुरवठादारा कडून अस्तरीकरणाचे काम स्वत: करुन घ्यायचे आहे.
१०. लाभार्थी समूहाने शेततळे उभारणीच्या निकषाबाबत कृषी विभागाचे क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन/ सूचना घेऊन सदर काम करावयाचे आहे.
११. खोदकाम पूर्ण झाल्यानंतर प्रथम मोका तपासणी साठी मंडळ कृषी अधिकारी यांना कळविण्यात यावे. मंडळ कृषी अधिकारी यांची तपासणी झाल्या नंतर त्यांच्या सुचनेनुसार पुढील अस्तरीकरण व इतर कामे करण्यात यावीत.
१२. शेततळयांचे खोदकाम पूर्ण झाले नंतर प्लास्टीक फिल्म अस्तरीकरणा करीता लाभार्थ्याने शेततळयाच्या आतील बाजूने योग्य रितीने फिनिशिंग / ड्रेसिंग करावी.
१३. शेततळ्याचे खोदकाम, अस्तरीकरण, पाणी भरणे आणि कुंपण या सर्व कामांची पूर्तता झाल्यानंतर, शेतकऱ्याने प्रकल्पाच्या पोर्टलवर देयके अपलोड करून अनुदान मागणी सादर करावी.

## ग्राम कृषी विकास समिती (GKVS)

१. गावातील इच्छुक लाभार्थी शेतकरी यांचे या घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचे अर्ज करणे व या घटकासाठी गावामध्ये जनजागृती करतील.
२. ऑनलाईन प्राप्त सर्व अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समुह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग शेतकरी व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार शेतकरी समूहाची निवड करावी.
३. इच्छुक समूहातील लाभार्थी स्वतंत्र कुटुंबातील आहेत याची खात्री करावी.
४. इच्छुक सामुहिक लाभार्थी समूह यांचे प्राप्त अर्जांच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणांसह अवगत करतील.
५. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे.

## समुह सहाय्यक

१. इच्छुक लाभार्थी शेतकरी समूहाचे अर्ज नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळ https://dbt-ndksp.mahapocra.gov.in या पोर्टल द्वारे अथवा महाविस्तार AI या मोबईल ॲप द्वारे अर्ज करण्यास मदत करतील.
२. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज छानणी करुन ग्राम कृषी विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील व समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करतील.
३. ज्या अर्जामधील कागदपत्रांची पूर्तता होत नसेल असे प्रस्ताव पुन्हा शेतकरी स्तरावर परत (Back To Beneficiary) पाठवतील.
४. शेतकऱ्यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच सामुहिक शेततळ्याबाबतचे आराखडे व तांत्रिक निकष समजावून सांगावे.

### सहाय्यक कृषी अधिकारी

१. समूह प्रतिनिधी अर्जदाराने ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाणणी करणे. छाननी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, ग्राम कृषी विकास समिती सभेचे इतिवृत्त, तसेच समूहातील शेतकरी एकाच कुटुंबातील नसल्याची खात्री करतील.
२. लाभार्थी शेतकरी समूहातील शेतक-यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी अथवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे तसेच शेततळे अस्तरीकरण या घटकाकरीता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला आहे काय?, याची पडताळणी करण्यात यावी.
३. लाभार्थी शेतकरी समूहातील शेतक-यांनी मागणी केलेल्या शेततळे आकारमानानुसार त्यांचकडे वर नमूद केल्याप्रमाणे किमान आवश्यक जमीनधारणा क्षेत्र असल्याची खात्री करण्यात यावी.
४. पात्र अर्जांच्या प्रस्तावित प्रकल्प स्थळाची शेतकऱ्याच्या अर्जामध्ये नमूद सर्वे नं. मध्ये प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी, आणि प्रस्तावित जागा निकषानुसार व तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री करावी.
५. शेततळे खोदाईनंतर निघणा-या मातीपासून शेततळ्याच्या भोवती भराव तयार करण्यासाठी साधारणत: तेवढ्याच आकाराची जागा व्यापली जाते, यासाठी लाभार्थीच्या मालकीचे क्षेत्र विचारात घेवून शेततळयाचे आकारमान निश्चित करणेबाबत लाभार्थीस मार्गदर्शन करणे.
६. नियोजित प्रकल्प स्थळाचा भौगोलिक स्थानांकित फोटो, आणि तपासणी बाबतचा तपशील स्थळ पाहणी अहवालामध्ये ( परिशिष्ट ३ ) प्रकल्पाच्या DBT App मध्ये नमूद करावा.
७. लाभार्थ्यास पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर शेततळ्याच्या मंजूर आकारमानानुसार खोदकामासाठी प्रत्यक्ष स्थळावर आखणी करून देणे व मार्गदर्शन करणे.
८. मोका तपासणी वेळी मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना सहाय्य करतील.
९. मंडळ कृषी अधिकारी यांचे समवेत कांमाची मापे घेऊन मापनपुस्तिकेमध्ये नोंदवावीत

### उप कृषी अधिकारी

१. खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थ्यास तांत्रिक मार्गदर्शन करणे.
२. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.

### मंडळ कृषी अधिकारी

१. कार्यक्षेत्रामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. काम सुरू असताना विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे.
३. सामुहिक शेततळ्याचे खोदकाम झाल्यानंतर मंडळ कृषी अधिकारी यांनी कामाची पाहणी करावी व त्यामध्ये सामूहिक शेततळयाच्या खोदाईचे काम करताना बाजूचा उतार योग्य ठेवणे, बाजूच्या भिंती सपाट व गुळगुळीत करून घेणे, शेततळ्यातील टोकदार दगड, धारदार वस्तू, काचा, झाडांच्या मुळया इ. काढून टाकून शेततळ्यात माती टाकून त्यावर पाणी मारून ते धुमसून घेणे इ. प्लास्टीक फिल्म अस्तरीकरणाच्या दृष्टीने सर्व पूर्व तयारी खोदाईचे काम करतानाच करून घेण्याबाबत लाभार्थ्यास मार्गदर्शन करावे. याबाबत मंडळ कृषी अधिकारी यांनी वैयक्तिक लक्ष दयावे. प्रस्तावित जागेमध्ये खोदाई करुन काढलेली माती शेततळयाच्या आकारानूसार लावून व दबाई करुन बांध बनविण्यात यावा.
४. सामुहिक शेततळ्याचे खोदकाम झाल्यानंतर संबधित मंडळ कृषी अधिकारी परिशिष्ट -५ मध्ये नमुद केल्या नुसार प्रथम मोका तपासणी करावी.

५. प्रथम मोका तपासणी वेळी मंडळ कृषी अधिकारी यांनी कांमाची मापे घेऊन मापनपुस्तिकेमध्ये नोंदवावीत.

६. प्रथम मोका तपासणी अहवालावर लाभार्थीची/त्यांच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली नाव नमूद करावे. प्रकल्प स्थळाचा भौगोलिक स्थानांकित फोटो, मापन पुस्तिका आणि तपासणी अहवाल अपलोड करण्यात यावा.

## तालुका कृषी अधिकारी

१. सहाय्यक कृषी अधिकारी यांचेकडुन पूर्वसंमती करिता शिफारस झालेल्या प्रस्तावांतील कागदपत्रांची व अर्जाची छाननी करावी.
२. लाभार्थी शेतकरी समूहातील शेतक-यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी अथवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे तसेच शेततळे अस्तरीकरण या घटकाकरीता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला आहे काय?, याची पडताळणी करण्यात यावी.
३. सहाय्यक कृषी अधिकारी यांनी सादर केलेला स्थळनिश्चिती अहवाल पडताळणी करण्यात यावी.
४. लाभार्थी शेतकरी समूहातील शेतक-यांनी मागणी केलेल्या शेततळे आकारमानानुसार त्यांचकडे वर नमूद केल्याप्रमाणे किमान आवश्यक जमीनधारणा क्षेत्र असल्याची खात्री करण्यात यावी.
५. सदरचे लाभार्थी शेतकरी समुह पूर्वसंमतीस पात्र असल्याबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांची खात्री पटल्यानंतर त्यांना सामुहिक शेततळे घटकासाठी ऑनलाईन पूर्वसंमती देण्यात यावी.
६. प्राप्त अर्जामध्ये कागदपत्रांची पुर्तता झाली नसेल, यास्तव पुर्ततेअभावी पुर्वसंमती देता येणार नसेल असे प्रस्ताव त्रुटी नमूद करून सहाय्यक कृषी अधिकारी यांना पुन्हा त्रुटी पूर्ततेसाठी परत (Sent Back) पाठवतील.
७. मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी समुह पात्र ठरत नसल्यास तालुका कृषी अधिकारी अर्ज रद्द (Reject) करतील.
८. शेतक-यांनी मागणी केल्यास त्यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच शेततळ्याचे तांत्रिक निकष व आराखडा समजून सांगावे तसेच अधिकृत फिल्म पुरवठादारांची यादी उपलब्ध करुन द्यावी.
९. खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे.
१०. मंडळ कृषी अधिकारी यांनी मापनपुस्तीकेत केलेल्या नोंदीची तपासणी करणे व स्वाक्षरी करणे.
११. शेतक-यांनी अपलोड केलेल्या देयकाची छाननी करुन तालुका कृषी अधिकारी यांनी परिशिष्ट -६ मध्ये नमुद केल्यानुसार अंतिम मोका तपासणी करावी.
१२. अंतिम मोका तपासणी अहवालावर लाभार्थीची / त्यांच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली नाव नमूद करावे.
१३. अंतिम मोका तपासणी करून मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका, देकयांच्या प्रमाणित प्रती व इतर आवश्यक कागदपत्रे प्रकल्पाच्या DBT App द्वारे अपलोड करावीत.
१४. शेतकऱ्यांनी बसविलेल्या प्लास्टीक फिल्म व तारेचे कुंपण यासह प्रकल्पाच्या DBT App द्वारे अक्षांश व रेखांशसह जिओ टॅग फोटो घेण्यात यावेत.
१५. मार्गदर्शक सुचने प्रमाणे अनुदान परीगणना तपासुन डीबीटी प्रणाली वरती अनुदानासाठी शिफारशी करणे.

## लेखाधिकारी उपविभाग स्तर :

१. तालुका कृषी अधिकारी यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावाची लेखा अधिकारी उपविभाग स्तर हे मुख्यतः खालील बाबींची छाननी करतील. लाभार्थ्याने आपलोड केलेली देयके, प्रथम व अंतिम मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका, स्थळ पाहणी फोटो, देकयांच्या प्रमाणित प्रती व इतर आनुषंगिक कागदपत्रे.
२. तालुका कृषी अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार आहे काय याची खातरजमा करतील.
३. प्राप्त प्रस्ताव तपासणी अंती मार्गदर्शक सूचनेनुसार परिपूर्ण असल्यास उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

४. प्रस्तावाच्या छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून संबंधीत तालुका कृषी अधिकारी यांचे कडे त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.

## उपविभागीय कृषी अधिकारी

१. उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. कार्यक्षेत्रामधील तालुक्यामध्ये मार्गदर्शक सुचने नुसार कामे होण्यासाठी सनियंत्रण करणे. अधिनस्त अधिका-यांकडुन विहीत वेळेत स्थळ पाहणी व मोका तपासणी पुर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणे.
३. लेखाधिकारी स्तरावरुन शिफारस झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावाची छाननी उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावर करण्यात येईल व लेखाधिकारी यांनी शिफारशीत केलेल्या अनुदानाच्या रकमेस अंतिम मान्यता देतील.
४. प्रस्तावाच्या छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून मागील डेस्क वर सदर प्रकरण त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.
५. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

## जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी:-

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर सामुहिक शेततळ्यासाठी लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. जिल्हास्तरावर विविध माध्यमातुन योजनेची प्रचार प्रसिध्दी करणे.
३. अस्तरीकरणासाठी वापरावयाच्या प्लास्टीक फिल्म चे नोंदनीकृत उत्पादक व वितरक यांची अद्यावत यादी कार्यालयात ठेवावी व अद्ययावत यादी वेळोवेळी क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात यावी.
४. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

## विभागीय कृषी सहसंचालक:

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विभाग स्तरावर झालेल्या कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा.

## तांत्रिक व सर्वसाधारण सूचना

१. लाभार्थ्याने शेततळे अस्तरीकरणासाठी अधिकृत ५०० मायक्रॉनची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक राहील. BIS मानकांनुसार रीइन्फोर्स्ड एचडीपीई जिओमेम्ब्रेन फिल्म (IS १५३५१:२०१५ Type II) दर्जाची प्लास्टिक फिल्म नोंदणीकृत उत्पादक किंवा त्यांच्या अधिकृत विक्रेत्यांकडून खरेदी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार अद्यावत यादी जिअकृअ व ताकृअ कार्यालयाने शेतक-यांना मागणीप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.
२. शेतकऱ्यांनी प्लास्टीक फिल्म ही उत्पादकाच्या Internal Laboratory Test Report (with batch number) च्या प्रतिसह खरेदी करावी व प्लास्टीक फिल्मचे देयक जीएसटीसह घ्यावे. मंजूर आकारमानापेक्षा मोठे शेततळे शेतकऱ्याने खोदल्यास खोदाईचा व अस्तरीकरणाचा अधिकचा खर्च शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे याबाबत संबधित मोका तपासणी करणा-या क्षेत्रिय अधिका-यांनी शेतक-यांना अवगत करावे.
३. प्लास्टीक फिल्मचा पुरवठा दर रु.७७ प्रती चौ.मी आणि फिल्म बसवण्यासाठी रु. १८ प्रती चौ.मी असा एकूण रु. ९५ प्रती चौ.मी. (जीएसटी दरासहीत) निश्चित करण्यात आलेला आहे.
४. फिल्म शेततळयाच्या काठापासुन बंद (अँकरींग) करून संपूर्ण शेततळ्यात अशा प्रकारे बसवावी की ज्यामुळे फिल्म पाण्याच्या वजनामुळे खाली घसरणार नाही व शेततळ्यातील साठलेले पाणी जमिनीमध्ये मुरणार नाही.
५. मानक आकाराचा (१.० मी x १.० मी सांध्यासहित) नमुना लाभार्थ्याच्या शेतपातळीवर अस्तर (lining material) बसविताना दोन प्रतींमध्ये घ्यावा. नमुने हे उत्पादकाचा प्रतिनिधी आणि लाभार्थी यांच्या उपस्थितीत तसेच दोन स्थानिक पंच / स्थानिक पुरस्कार प्राप्त प्रगतशिल शेतकरी यांच्या साक्षीने योग्य प्रकारे सीलबंद करावा. एका प्रतीचा नमुना शेतकऱ्याजवळ ठेवावा व दुसरी प्रत संबंधित उत्पादक /वितरकाकडे ठेवण्यात यावी. हायड्रोस्टॅटिक रेसिस्टन्स (Hydrostatic resistance) चाचणीसाठी असा नमुना निवडला जाईल की ज्यामध्ये किमान एक सांधा (joint) समाविष्ट असेल याची दक्षता घ्यावी.
६. पुरवठा करीत असलेल्या प्लास्टीक फिल्मची गुणवत्ता पडताळणीसाठी आवश्यक असलेल्या नमुन्याकरीता लागणारी (१ मीटर x १ मीटर) फिल्म विनामुल्य देणे उत्पादक / पुरवठादार / अधिकृत विक्रेता यांचेवर बंधनकारक राहील.
७. शेततळयांचे प्लास्टीक फिल्मची देखभाल / संरक्षण शेतकरी यांचेमार्फत केली जाईल. प्लास्टीक फिल्मबाबत गुणवत्ता व दर्जाची हमी देण्याची जबाबदारी उत्पादक / पुरवठादार याची राहील.
८. शेततळयातील पाणी वापरण्यासाठी सुक्ष्म सिंचन पध्दतीचा वापर करणे बंधनकारक राहिल.
९. सामूहिक शेततळयाचे आकार मापदंडाच्या मर्यादेच्या अधिन राहून उपलब्ध क्षेत्रीय परिस्थितीनुसार ठरविण्यास लाभार्थ्यांना मूभा राहिल. परंतु, शेततळ्याची खोली व एकूण बांधाची उंची यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.
१०. सामुहिक शेततळयांसाठी जमिनीच्या वर बांध घालून पाणीसाठा करावयाचे हाफ डगआऊट विविध क्षमतेचे शेततळे, खर्चाची सविस्तर अंदाजपत्रके, गृहीतके व अनुदान मर्यादा सोबत (प्रपत्र-१ अ, प्रपत्र-१ ब व प्रपत्र-१ क) मध्ये देण्यात आलेली आहेत.
११. प्रकल्प स्थळी कायम स्वरुपी ३ x २ फुट आकाराचा पक्का फलक लावून त्यावर "नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने" असे नमूद करुन शेतकऱ्याचे नाव, गाव, सर्वे नं., शेततळ्याचे आकारमान, वर्ष, एकुण खर्च रक्कम, अर्थसहाय्याची रक्कम इत्यादी तपशील नमूद करावा.
१२. सदरचा खर्च सामुहिक शेततळे अंदाजपत्राकतील इतर (contingency ) या बाबीखाली भागविण्यात यावा.
१३. नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

## क्षेत्रीय तपासणी-:

सामुहिक शेततळे या घटकाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सनियंत्रण अधिकाऱ्यांनी खालील नेमून दिलेल्या प्रमाणे आर्थिक वर्षात तपासणी करावी व तपासणी अहवाल सादर करावा.

| सनियंत्रण अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|
| विभागीय कृषी सहसंचालक | प्रत्येक उपविभागतील किमान १ काम |
| नोडल अधिकारी, वि.कृ.स.सं. कार्यालय | प्रत्येक उपविभागतील किमान १ काम |
| जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | २ % किंवा कमीत कमी १२ कामे |
| नोडल अधिकारी, जि.अ.कृ.अ. कार्यालय | २ % किंवा कमीत कमी १२ कामे |
| उपविभागीय कृषी अधिकारी | प्रत्येक तालुक्यातील किमान ५ कामे |
| तालुका कृषी अधिकारी | १०० % |
| मंडळ कृषी अधिकारी | १०० % |

**परिशिष्ट १ –**

**अर्ज छाननी विविध स्तर**

| अनु क्र. | कार्यवाही प्रक्रिया | स्तर | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | लाभार्थी शेतकरी समुह यांनी अर्ज करणे व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे | लाभार्थी | - |
| २. | लाभार्थी यांनी अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती यांची पडताळणी करणे | समुह सहाय्यक | १० दिवस |
| ३. | ग्राम कृषी विकास समितीची मान्यता घेणे | समुह सहाय्यक / ग्राम कृषी विकास समिती | १० दिवस |
| ४. | लाभार्थींनी अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती तसेच ग्राम कृषी विकास समितीची मान्यता यांची पडताळणी करणे, स्थळ पाहणी करणे. | सहाय्यक कृषी अधिकारी | १० दिवस |
| ५. | पूर्वसंमती देणे | तालुका कृषी अधिकारी | १० दिवस |
| ६. | अनुदान मागणी करणे | लाभार्थी शेतकरी | १२० दिवस |
| ७. | प्रथम मोका तपासणी करणे | मंडळ कृषी अधिकारी | १० दिवस |
| ८. | अंतिम मोका तपासणी करणे | तालुका कृषी अधिकारी | १० दिवस |
| ९. | लाभार्थी यांनी अपलोड केलेली देयके, मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका व इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणे व अनुदान शिफारस करणे | लेखाधिकारी (उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय) | १० दिवस |
| १०. | अंतिम अनुदान मंजुरी देणे. | उपविभागीय कृषी अधिकारी | १० दिवस |
| ११. | अनुदान वितरण करणे . | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष | - |

## परिशिष्ट - २
## हमीपत्र

### नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प — सामुहिक शेततळे

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत आम्ही **"सामुहिक शेततळे"** या घटकासाठी डीबीटी पोर्टलवर आमचे गटाचे प्रतिनिधी श्री . ---------------------------------------------------- यांचे मार्फत ऑनलाईन अर्ज करीत आहोत. योजनेच्या मार्गदर्शक सूचनामधील विहीत अटी व शर्ती आम्हाला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र आम्ही सादर करीत आहोत.

**आम्ही सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. सामुहिक शेततळे या घटकाच्या लाभाकरिता अर्ज करण्यात आलेली जमीन आमच्या गटाचे प्रतिनिधी श्री. -------------------------------------------------- यांच्या नावे असलेल्या गट क्रमांक ------------------ मधील ---------- हेक्टर क्षेत्रावर असून, त्या ठिकाणी -------------------------- आकाराचे शेततळे बांधण्यात येणार आहे.
२. संबंधित शेततळ्यासाठी त्यांनी त्यांच्या शेतातील जागा उपलब्ध करून दिली आहे. तसेच, या जमिनीवर शेततळे उभारण्यास गटातील सर्व सदस्यांची संमती आहे. देय शासकीय अनुदान त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा होणार असल्याची आम्हाला पूर्ण कल्पना असून ते आम्हाला मान्य आहे.
३. सामुहिक शेततळे घटकाच्या लाभाकरीता मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे आम्ही प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यास बांधील आहोत.
४. यापूर्वी गटातील कोणत्याही सदस्याने इतर कोणत्याही शासकीय योजनेमधून सामुहिक शेततळे, वैयक्तिक शेततळे, अथवा भातखाचरातील बोडी तसेच शेततळे अस्तरीकरण या बाबीकरीता अनुदान घेतलेले नाही अथवा यापुढे घेता येणार नाही याची आम्हाला जाणीव आहे.
५. पूर्वसंमती प्राप्त सर्वे नंबर मध्ये सामुहिक शेततळे घेणे आमच्यावर बंधनकारक राहील.
६. पूर्वसंमती मिळाल्यापासून सामुहिक शेततळ्याचे खोदकाम, अस्तरीकरण, पाणी भरणे व कुंपण करणे इ. कामे चार महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक असल्याची आम्हाला जाणीव आहे.
७. शेततळे अस्तरीकरणासाठी BIS Standard मधील ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन IS १५३५१:२०१५ Type II या दर्जाची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक असल्याची आम्हाला जाणीव आहे.
८. शेततळे अस्तरीकरणासाठी लागणारी फिल्म नोंदणीकृत उत्पादक व वितरक यांचेकडून खरेदी करणे आम्हाला बंधनकारक राहील.
९. सदर कामासाठी साठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही याची आम्हाला जाणीव आहे.
१०. सामुहिक शेततळ्याच्या आकारमानानुसार व प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या मोजमापानुसार शासनाकडून एकूण खर्चाच्या विहीत मर्यादेत अनुदान मिळणार आहे याची आम्हाला जाणीव आहे. याबाबत गटातील कोणत्याही सदस्याची कोणतीही तक्रार असणार नाही. देय शासकीय अनुदाना व्यतिरिक्त येणारा खर्च आम्ही स्वतः करू.
११. नैसर्गिक आपत्तीमुळे सामुहिक शेततळ्यास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही याची आम्हाला जाणीव आहे.
१२. सामुहिक शेततळ्याचे संरक्षण देखभाल व दुरुस्ती करण्याची पूर्ण जबाबदारी आमची राहील याची आम्हाला जाणीव आहे.

१३. सामुहिक शेततळ्याचे खोदकाम पूर्ण होताच आम्ही मंडळ कृषी अधिकारी यांना प्रथम मोका तपासणी करता अवगत करू. तसेच त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार शेततळ्याचे पुढील काम पूर्ण करू.
१४. शेततळ्यात साठवलेल्या पाण्याच्या वाटप व वापराबाबत आम्ही परस्परांमध्ये निर्णय घेऊ आणि त्यासाठी आम्ही स्वतः जबाबदार राहू. या संदर्भात कृषी विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.
१५. सामुहिक शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यावर प्रकल्पाचा ४x३ फूट आकाराचा बोर्ड लावणे आम्हाला बंधनकारक राहील.
१६. आम्ही घोषित करतो की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

| समूहातील शेतकऱ्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|
| १. ---------------------------------------------- | ---------------------------- |
| २. ---------------------------------------------- | ---------------------------- |
| ३. ---------------------------------------------- | ---------------------------- |
| ४. ---------------------------------------------- | ---------------------------- |
| ५. ---------------------------------------------- | ---------------------------- |

(सदर हमीपत्र साध्या कागदावर तयार करून प्रकल्पाच्या पोर्टलवर अर्ज सादर करताना अपलोड करावे.)

## ( परिशिष्ट ३ )

### सामुहिक शेततळे या घटकासाठीचे स्थळ पाहणी व जागा तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबतचा सहाय्यक कृषी अधिकारी यांचा अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | सदर अर्ज ग्राम कृषी विकास समितीने (GKVS) बैठकीमध्ये मंजूर केल्याचा दिनांक | |
| २. | प्रस्तावित प्रकल्प स्थळाची समूहातील लाभार्थी/लाभार्थी प्रतिनिधी यांचे समक्ष पाहणी केल्याचा दिनांक | |
| ३. | लाभार्थी समूहाने मागणी केलेल्या शेततळ्याचे आकारमान (मी) | |
| ४. | लाभार्थ्यांचे शेतकरी आयडी नुसार एकूण क्षेत्र (हे.) | |
| ५. | समूहात समाविष्ट लाभार्थ्यांचे प्रकल्प गावातील एकूण क्षेत्र (हे.) | |
| ६. | लाभार्थी समूहाकडे मार्गदर्शक सूचनेनुसार प्रकल्प गावामध्ये किमान आवश्यक जमीनधारणा आहे काय? | |
| ७. | शेततळ्यासाठी प्रस्तावित स्थळाचा सर्वे नं./गट नं. | |
| ८. | लाभार्थीने दाखविलेली जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय? | होय /नाही |
| ९. | लाभार्थी समूहातील शेतकऱ्याने यापूर्वी शेततळे, सामुहिक शेततळे, बोडी, तसेच शेततळे अस्तरीकरण या घटकाचा लाभ इतर शासकीय योजनेतून घेतलेला आहे काय ? | होय /नाही |
| १०. | स्थळ तपासणीबाबतचे अभिप्राय | |
| ११. | वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थी समूहास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे/नाही. | होय /नाही |

शेतकरी सामुहिक शेततळे घेण्यास इच्छूक असून क्षेत्रीय पाहणीत शेतकऱ्याने दाखविलेली जागा शेततळे घेण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य व पुरेशी आहे.

**स्वाक्षरी/-**

**जागा पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव :-- _________________________**

**पदनाम :- सहाय्यक कृषी अधिकारी**

**सजा: _________________________**

(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदर परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

**परिशिष्ट - ४ अ**
**शेतक-याचा खोदकाम पूर्णत्वाचा अहवाल**
**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**
**सामुहिक शेततळे**

मी श्री / श्रीमती ------------------------------------------ समूह प्रतिनिधी गांव --------------------- तालुका --------------------- जिल्हा.--------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषी अधिकारी ------------------ यांच्या पूर्व संमतीपत्र क्र. . ------------------- दिनांक / /२० अन्वये आम्हाला मंजूर केलेल्या ---------X---------X--------- मीटर या आकारमानाच्या समुहिक शेततळ्याचे खोदकाम आखणी करून देण्यांत आल्या प्रमाणे आम्ही दिनांक --------------------- अखेर पूर्ण केले आहे.

कृपया, प्रथम मोका तपासणी करण्यात यावी व शेततळ्याच्या कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेण्यात यावी. जेणेकरून प्लॅस्टिक अस्तरीकरण, कुंपण व शेततळ्यात पाणी भरणे इत्यादी पुढील कामे आम्हाला लवकर सुरू करता येतील.

दिनांक ---------------------

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती

| अ.क्र. | समूहतील इतर शेतकऱ्यांची नावे | सही/अंगठा |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

## परिशिष्ट - ४ ब
## शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल
## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
## सामुहिक शेततळे

